(Marathi)

११०
९।२१

1341 २ P

1341. 1341

प्रभात फेरी साठीं

# भगवा झेंडा

## स्वदेश पद्यावली भाग १ ला.



पी. बी. पाठक आणि कंपनी

महात्मा एजन्सी गिरगांव मुंबई.

किंमत १ आणा

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1341
Date 11·1·72
GOVT. OF INDIA

IMPERIAL RECORD
RECEIVED
8 - APR. 1932
DEPT

# भगवा झेंडा पद्यावली.

## भाग १ ला.

### अटक न त्याला (राग—सिंधुरा)

झेंडा भगवा । अटक न त्याला ।
अखिल जगभर । चला फडकवा ॥
घ्या भाला करिं । पळवा अरिला ॥ धृ०॥
शिव शाहिचा । अभिमान ज्यांत ।
चैतन्य ज्योत । गुरुदासांच ।
स्फूर्तिदायक प्रसाद ठेवा ॥ १ ॥
आळस सोडा बसतां घरांत ।
जग विसरलांत । क्षणि जाय पुढें ।

ह्याची लाज न वैभव मिळवा ॥ २ ॥
धन्य मराठे मिळवा जगांत ।
कफनी अंगीं । क्रांति घडवा ।
भूमातेचे । हेतु पुरवा ॥ ३ ॥

## हर हर जय बोला [ चाल—भारत भू गाय ]

हर हर जय बोला । शुभवेला ।
स्वराज्य प्राप्तीला ॥ धृ० ॥
रत्नें निलमणी । ही खाणी ।
वीरांची जननी ॥ १ ॥
गनिमी काव्याची । तुज कुंची ।
समर्थ सद्‌गुरूंची ॥ २ ॥
तान्हा शिवबाजी । रणगाजी ।
धनाजी तो संताजी ॥ ३ ॥

घोडे नाचविले । गाजविले ।
कर्मवीर झाले ॥ ४ ॥
सह्याद्री क्षेत्र । मोक्षार्थ । हे आहे रणतीर्थ ५

## ऊठ बांधुनी चंग—

( चाल—लगाव लगाव लगे ढोल ]

चल ऊठ बांधुनी चंग । भारता ।
फुंक फुंक रणशिंग ॥ धृ० ॥
हा नोकरशाही जाच ।
हा हुतुतु नंगा नाच ।
ही अधोगतीची खांच ॥ भारता ॥
तुमच्यांत पाडुनी फूट मिळविती सदोदित लूट ।
हे धंदे ब्यूरक्रासिचे ॥ भारता ॥ २ ॥
ये ऊत दडपशाहीला । मांडिलें घोर सत्राला ।

नावरे 'खैस' कोणाला ! ॥ भारता० ॥ ४ ॥
आसेतुहिमाचल जावें । जनीं ध्वनि ऐकावे ।
हें असे दिवस कां यावे ? ॥ भारता० ॥ ५ ॥
येथले धनि जे मूळ । ये त्यांना पडता काळ ।
ते निर्व्वळ बनले कूळ ॥ भारता० ॥ ६ ॥
कां पुरे न झाली झोंप । ओळखी विषारी सर्प ।
रज्जुल नको म्हणुं साप ! ॥ भारता० ॥ ७ ॥
अवदसा लयाला जावी । सुस्थिती आपणा यावी ॥
कारणें दुहि टाकावी ॥ भारता० ॥ ८ ॥
चल ऊठ लाग कार्याला । हा सांप्रत मोका आला ।
तूं अजिंक्य हो जगताला । भारता फुंक फुंक रणशिंग

## चला या देशसेवेला ( चाल-कवाली )

चला या देश सेवेला । त्यजोनी स्वार्थबुद्धिला ॥धृ०॥
दुहीनें आजपर्यंत । कसा केला राष्ट्रघात ।

म्हणोनी ना आज तुम्ही । लोळतां दास्य पंकांत॥१॥
स्वार्थ सारा झुगारोनी । देशकार्या पुढें यावे ।
आपसांतील वैरभाव । सर्व सोर लया न्यावे ॥२॥
एकिनें ध्येय साधिल । भारता सुदिन येतील ।
करामतीनें साध्य हो सोरे । निराशा ठार बुडवील ॥३॥
मातृभुची हांक एका । चला सारे सर्व मिळुनी ।
वाद कसला करीत बसलां । शहाणे कां
तुम्ही म्हणुनी ॥ ४ ॥
कुणी सत्याग्रही म्हणतो । कुणी नाफेर फेरवाला ।
मातृभुला स्वराज्याचे । विवर मांडे खाऊं घाल ।॥५॥
वाद भेदा मरूं द्यांना । दुहीला द्या, मूठमाती ।
फितूरीला, तिलांजली द्या । कसा लावा मातृभक्ति ॥६॥

# बहिष्कार

ही एक प्रार्थना ऐका परदेशी ।
कपडा टाका ॥ बंधुनो ॥
ही रडे भारती माता ॥ कां हिचा श्राप हो घेता ॥
अशी वेळ नये कधिं आतां,
बंधूनो घ्या हो शपथा ॥ ही एक ॥
आंगाच्या वस्त्रांकरितां ॥ परक्यांचीं तोंडें बघता ॥१॥
दिनवाणी दशा ही येतां,
येईना कधीं त्या तूट ! ॥ भारता० ॥ २ ॥
हें होम कुंड शिक्षेचें । घे नित्य बळी लोकांचे ।
वाटे न मनाला खंता ॥ ही एक ॥
हा महाराष्ट्र टिळकांचा ॥ हा स्वस्थ बैसला कैचा ॥
जो नाद करी सिंहाचा,

तो आज लोपला कैचा ॥ ही एक ॥

हा मंत्र लोकमान्यांचा ॥ हा मंत्र महात्माजींचा ॥

बंधुनो करा जप याचा,

हा मंत्र स्वातंत्र्याचा ॥ ही एक ॥

वापरा स्वदेशी खादी ॥ गरिबीची वस्त्रें साधी ॥

द्या रजा डाम-डौलाला'

कां अजुनी झोंपा घेतां ॥ ही एक ॥

मलमलिची वस्त्रें सोडा ॥ परदेशी फासण तोडा ॥

नच दिसे कसा हा पैका,

जो जातो परदेशाला ॥ ही एक ॥

ध्या आज स्वदेशी दिक्षा ॥ ही एक मागतो भिक्षा ॥

अशि वेळ नये कधिं हाता,

बंधूनो ध्या हो शपथा ॥ ही एक ॥

## चरका-गीत [ चाल—पाळण्याची ]

अजि भाग्याचा उजाडला दिन साचा,

हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ धृ० ॥

ही हिन्द—माइ कां रुसली । का हितें कुणी वंचीली॥

हिज रंजविण्या सुपुत्र नुरला कैचा'

हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ १ ॥

कां शोकाकुल झाली माता । तो ' बालतिलक'

बघता होतां ॥ जो मातेचा बाळ नव्या नवसाचा,

हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ २ ॥

जो शिकवी आर्या सकलां । परतंत्र पंकि कां रुतलां

गंभिर नादाचा लोप जाहला कैचा,

हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ ३ ॥

परि हाय कृपा ईशाची । गीतेंत बेद जो वांची ॥

अधर्म छेडाया अवतार घडे धर्माचा,
हा हिन्द--स्वातंत्र्याचा ॥ ४ ॥

हो धन्य भूमि गुर्जरही । ' श्रीगांधी ' जन्मा घेई ॥
जन्मुनि फेडी जो पांग प्रियमातेचा,
हा हिन्द--स्वातंत्र्याचा ॥ ५ ॥

हा राष्ट्र--सिंह जागा केला, । असहकार मंत्रें भरला॥
ह्या मंत्राचा जप करा अहर्निश साचा,
हा हिन्द--स्वातंत्र्याचा ॥ ६ ॥

हा गमे नाथ भगवान । करि स्वराज्य--गीता कथन ॥
घेई सुदर्शना हस्तीं ' चरक--सुताचा '
हा हिन्द--स्वातंत्र्याचा ॥७॥

हा भासे उदय रवीचा । करि भंग घोर तिमिराचा ॥
देई प्रकाश जो मातृभूमि--प्रेमाचा,
हा हिन्द--स्वातंत्र्याचा ॥ ८ ॥

अजि गती अन्य ना उरली । ही एक 'चरक
माउली ' ॥ हा हात धरा संकटि त्या माउलीचा,
हा हिन्द स्वातंत्र्याचा ॥ ९ ॥

हें सूत गमे हा पान्हा, हा हिन्द बाळ हो तान्हा ॥
पंचप्राणचि हा हा देशी धंद्याचा,
हा हिन्द स्वातंत्र्याचा ॥ १० ॥

ही दोरी पाळण्याची । मातांनीं ओढायाची ॥
हिन्दी--मातांनां अभिमान स्वातंत्र्याचा,
हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ ११ ॥

हें बाळकडू बाळाचें, हें गीत स्वातंत्र्याचें ॥
अजि भाग्याचा उजाडला दिन साचा,
हा हिन्द—स्वातंत्र्याचा ॥ १२ ॥

# मद्यपान - निषेध.

ही दारु सोडा यार करी बेजार ॥
ह्या दारुपायीं कितीक गेले आणि किती जाणार ॥
ही वाट खरी दुर्गतिची ॥ कीं अधर्म खाणी साची॥
ही गर्मे खाइ नरकाची ॥
हिच्यापायीं सर्वदा आपुला नाश पहा होणार ॥
॥ ही दारु ॥
कां गमवितां हा पैसा ॥ अविचार सुचे हा कैसा ॥
ही सुरा जादुचा फांसा ॥
घरीं उपाशीं बाळें त्यांची काय गती होणार ॥
॥ ही दारु ॥
नच धान्य घरामधिं कांहीं ॥ मारवाडि करितो घाई॥
कोडताची पाळी येई ॥

ह्या दारूपायीं भीक लागली शहाणे काधिं होणार ॥
॥ ही दारु ॥
ही दारु हृदया जाळी ॥ अकलेची करिते होळी ॥
रस्त्यांत करी बंडाळी ॥
घरी शिपाई येऊन हातीं कडितोडे पडणार ॥
॥ ही दारु ॥
ही पुढें वाट तुरुंगाची ॥ जी करी होळी अब्रूची ॥
अशि कथा दारूबाजीची ॥
ह्या दारूपायीं भीक लागली शहाणे कधीं होणार ॥
॥ ही दारु ॥

( चाल—धन्य शिवाजी तोरणगाजी )

देशबंधुनो चला उठा हो स्वस्थ कसे बसलां ॥
परवशतेच्या पंकिं आपुला देश पहा रुतला ॥१॥
'स्वराज्य आमुचा हक्क असे हा जन्मसिद्ध साचा ॥

सांगुनि गेला बाळ आम्हाला भारत मातेचा ॥ २ ॥
त्या बाळाची वाणी कां हो आज होय फोल ॥
कोण असा बोलेल पुन्हां ते धैर्याचे बोल ? ॥ ३ ॥
'स्वदेशीविणें स्वराज्य नाहीं' वदले गांधीजी ॥
सत्यकरा हो वाणी त्यांची वीर भले गाजी ॥ ४ ॥
श्रीकृष्णाचें सुदर्शन पहा चरका अवतरला ॥
नेई चरका दारिद्र्याला काळचि दुष्काळा ॥ ५ ॥
घरोघरीं जरि चरका नांदे स्वतंत्र हो देश ॥
आर्यबंधूना हाचि महात्माजींचा संदेश ॥ ६ ॥
रुपये जाती परदेशातें जे कोटी साठ ॥
लक्ष्मीची थांबवा बंधुनो ही वांकुडी वाट ॥ ७ ॥
अन्न मिळेना पोटातें ही दशा कितेकांची ॥
कशी आवडे विदेशी अशा वेळीं परक्यांची ॥ ८ ॥
विदेशी वस्त्रें त्यजा बंधुनों खादी स्वीकारा ॥
स्वतंत्रतेचा हा भंडारा नच धिःकारा ॥ ९ ॥

**पद** ( चाल—मंगलदेशा पवित्रदेशा )


भूमा वाटे हिन्दुस्थानी राजद्रोह हा माजतसे ॥
बंदी घालुनी तरुण हिन्दु थांबवुं आम्हि त्यां भासे।१।
यास्तव करिता पकडापकडी धरून नेती हिन्दुना ॥
शूर खरे ते राष्ट्रासाठीं देति आपुल्या जे माना॥ २ ॥
लेखक, वक्ते, राष्ट्रवीर किति पकडोनि नेती ॥
परी कराया जना क्षुब्ध हो हींच कारणें कीं होती।३।
दंड करी ती किती जणाना फांशि किती देती ॥
जन्मठेप ते काळ्यापाण्या धाडुनियां देती ॥ ४ ॥
वाटे त्याना पायदळीं हें सहज तुडवुं राष्ट्र ॥
यास कराया चीतच अम्हा नच लागतील कष्ट ॥५॥
परी करीतों स्पष्ट सूचना सरकारा आह्मी ॥
दडपशाहि हि बंद करा हा एक दिलानें कीं तुम्हि ।६।
हिन्दुधर्म हा हिन्दराष्ट्र हें हिन्दवीर हे असती

दडपशाहीला प्राणांतीही माना नच ते वांकविती ॥७॥
जरि आपुल्या सत्तेचा जरि तुम्ही दाखवूं लागाल ॥
चिडुनि जातां हिन्दुराष्ट्र हें मुढ भावना वाढेल ॥ ८॥
मित्रा सोज्वळ दीना प्रेमळ अरिला कर्दनकाळ ॥
ब्रीद असे हें हिन्दुपणाचें पतितांचा कनवाळ ॥ ९ ॥
पवित्र मंगळ शूर साहसी हिन्दु तेजाळ ॥
महन्मंगला आर्यभूमिचा स्वातंत्र्योत्सुख तो बाळ।१०।
शार्दुलाचा छावा हिन्दु तुम्हां कधीं नच वांकेल ॥
सत्य तेज हें आर्यभूमिचें जगतावरतीं फांकेल ॥११॥
यास्तव सत्ताधारी लोकां हेंच सांगतों आतां ॥
आमुच्या मत्तेवरी चालवूं नका अबाधित ती सत्ता १२
हिन्दुदेश हा आर्यजनांचा त्रिकाल बाधित हें सत्य ॥
लोप तयाचा करूं न शकला अजुनि कुणिही
हो मर्त्य ॥ १३ ॥
यास्तव कथितों स्वराज्य देउन हिन्दुना वळवा ॥

अन्य उपायें कधीं न वळती सर्व जगाला
हें कळवा ॥ १४ ॥

## ॥ प्रार्थना ॥

स्वतंत्रते देवी, प्रार्थितों तुजला ॥
प्रसन्न आम्हाला, व्हावें माते ॥
परदास्य-पंकीं, देश हा रुतला ॥
मोताद अन्नाला, केंवि झाली ॥
परचक्र यांनीं, धर्म छळ केला ॥
म्लेंछांहि हिन्दूनां, नाडिलें हो ॥
तुझीया कृपेनें, शिवबा ते वेळां ॥
जन्म घेता झाला, महाराष्ट्रीं ॥
मर्दोनि म्लेंछांसी, सोडविली माय ॥
ब्राम्हणें ती गाय, रक्षियेली ॥
अवकृपा केंवि, जाहली ये वेळां ॥
भेट देई बाळा, माते वेगीं ॥




संग्राहक मुद्रक व प्रकाशक

दा. बी. पाठक श्री पांडुरंग वैभव प्रेस.

सूर्यमहाल गिरगांव मुं. नं. ४